फ्लॅट जागेत इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग करुन द्यावयाची आहे मात्र त्यांस लागणारे इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन व पाण्याचे कनेक्शन तुम्ही तुमचे स्वखर्चाने घ्यावयाचे आहे. तसेच सदरचे दस्तासोबत जोडलेल्या **परिशिष्ट 'अ'** मध्ये नमुद केलेल्या सामाईक क्षेत्र व सुविधा ह्या इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईकात असून त्यात उपरोक्त फ्लॅट जागेचा ०.००% अविभाज्य हिस्सा राहावयाचा आहे. यांस चतु:सिमा : पूर्वेस : --------------------, पश्चिमेस : ----------------, उत्तरेस : ------------------, दक्षिणेस : ---------------.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील ------- मजल्यावरील फ्लॅट नंबर ..... (-----) ची घरजागा आतील दरवाजे, खिडक्या, इलेक्ट्रीक फिटींग, नळ फिटींग, किचन ओटा तसेच **'समृध्दी अपार्टमेंट'** या इमारतीचे दिनांक .................. रोजी दस्त क्रमांक ........... नुसार नोंदणीकृत केलेल्या घोषणा पत्रात नमुद केल्याप्रमाणेच्या सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे मालकी व वापर हक्कासह व तदंगभूत वस्तुंसह मी तुम्हांस रक्कम रूपये ................/- अक्षरी रूपये -------------------- मात्रवर कायम स्वरुपी पूर्ण मालकी हक्काने खुश खरेदी देऊन तुमचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत व ताब्यात देण्याचा सौदा आज रोजी पक्का केला. सदरची उपरोक्त फ्लॅट घरजागा, सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्यासहचा सोईकरीता **'सदर फ्लॅट मिळकत'** म्हणून खाली संबोधित केलेली आहे. त्या फ्लॅट मिळकतीबाबतची वरीलप्रमाणेची ठरलेली रक्कम

तुम्ही लिहून घेणार यांनी मी लिहून देणार यांना बांधकामाचे प्रगतीनुसार वेळोवेळी मिळुन खालील नमुद केल्याप्रमाणे द्यावयाची आहे. त्याचा तपशील :

रू. ०९% सदरची रक्कम बुकींगच्या वेळी ॲडव्हान्स म्हणून द्यावयाची आहे.

रू. २१% सदरची रक्कम फ्लॅट मिळकतीचे तळाचा स्लॅब पुर्ण झाल्यानंतर द्यावयाची आहे.

रू. २०% सदरची रक्कम फ्लॅट मिळकतीचे छताचा स्लॅब पुर्ण झाल्यानंतर द्यावयाची आहे.

रू. १५% सदरची रक्कम फ्लॅट मिळकतीच्या भिंती पुर्ण झाल्यानंतर द्यावयाचे आहे.

रू. १५% सदरची रक्कम फ्लॅट मिळकतीच्या भिंतींना आतील प्लास्टर पुर्ण झाल्यानंतर द्यावयाचे आहे.

रू. १०% सदरची रक्कम फ्लॅट मिळकतीस फ्लोअरींग टाईल्स बसविल्यानंतर द्यावयाची आहे.

रू. १०% सदरची रक्कम तुम्ही लिहून घेणार यांनी दिनांक .................. चे दिवशी किंवा त्याआधी सदर फ्लॅट मिळकतीचा ताबा घेणेपूर्वी, खरेदीखत लिहून व नोंदवुन देण्याचे अगोदर द्यावयाची आहे.

**रू.१००% एकूण अक्षरी रूपये --------------- मात्र.**

सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीपोटी तुम्ही लिहून घेणार यांचेकडुन मी लिहून देणार यांना खालील नमुद केल्याप्रमाणेची रक्कम मिळालेली आहे त्याचा तपशील :

रू. ०,००,०००/- अक्षरी रूपये ---------------- मात्रचा -------------- बँकचा चेक नं............... दि. ................ नुसार मिळाली ती यांत मजरा.

रू. ०,००,०००/- अक्षरी रूपये ---------------- मात्रचा -------------- बँकचा चेक नं............... दि. ................ नुसार मिळाली ती यांत मजरा.

**रू. ०,००,०००/- एकूण अक्षरी रूपये ----------- मात्र.**

सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीचे विक्री व्यवहाराच्या अटी व शर्ती खालील नमुद केल्याप्रमाणे :

०१) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीच्या किंमतीत सर्व्हीस टॅक्स, वॅट टॅक्स, उपकर, जीएसटी वा अन्य कोणतेही तत्सम टॅक्सेस अंतर्भुत नाहीत. सबब वरील प्रमाणेचे आज लागणारे टॅक्सेस भरण्याची सर्वस्वी जबाबदारी तुम्ही लिहून घेणार यांचीच आहे. तसेच सदर फ्लॅट

मिळकतीचे खरेदीखात तुम्हांस लिहून व नोंदवुन देण्यापूर्वी काही कर लागल्यास जसे; जीएसटी किंवा तत्सम करांची रक्कम तुम्ही लिहून घेणार यांनी मी लिहून देणार यांना रोखीने किंवा चेकने जमा करणे लिहून घेणार यांचेवर बंधनकारक आहे व राहील. या संदर्भात RERA Act व GST मधील तरतुदीचे बंधन लिहून घेणार व लिहून देणार या दोघांवर बंधनकारक राहील.

०२) सदर फ्लॅट मिळकतीचा उपभोग तुम्ही इतर फ्लॅट धारकांना किंवा दुकान धारकांना त्रास होणार नाही अशारितीने रहिवास कामी वापर करावयाचा आहे.

०३) सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीस धोका निर्माण होईल किंवा इमारतीचा बाह्य-शो व डिसेन्सी तसेच मुळ स्ट्रक्चर यांत बदल होईल असे कोणत्याही प्रकारचे कृत्य अगर फेरबदल तुम्ही लिहून घेणार यांना करता येणार नाही.

०४) सदर **'समृध्दी अपार्टमेंट'** या इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी असलेल्या सामाईक सुखसोईंचे दुरुस्ती, सुधार, बिघाड, मेंटेनन्ससाठी द्यावा लागणारा सामाईकातील खर्च तुम्ही हिस्सेराशीने वेळचेवेळी सदरचे असोसिएशनला द्यावयाचा आहे.

०५) सदर फ्लॅट मिळकतीबाबत खरेदीच्या तारखेपासुन येणारे शासकीय व निमशासकीय कर, बिनशेती कर, महानगरपालिका कर वगैरे तुम्ही लिहून घेणार यांनीच भरावयाचे आहे. मात्र